कोकणसाद
www.kokansad.com

**शुक्रवार,** दि. ३० सप्टेंबर २०२२

# आपल्या अंतर्गत कला विकसित करा!

**■ शरद सावंत यांचे प्रतिपादन ■ हळबे महाविद्यालयात अभिनय कार्यशाळा संपन्न**

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग :** कला ही माणसाला जगवते. चांगले जगण्याची प्रेरणा देते. वाईट विचारापासून दूर ठेवते. माणसाच्या मनामध्ये सर्जनशीलता निर्माण करते. माणूस ओळखण्यास आणि समाजाला समजून घेण्यास प्रेरित करते. म्हणून प्रत्येकाने आपल्या अंतर्गत कला विकसित केली पाहिजे. तरच आपला सर्वांगीण विकास होतो. आपण माणूस बनतो, असे प्रतिपादन शरद सावंत यांनी केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयामध्ये अभिनय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शरद सावंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत होते.

दरम्यान, आपल्या मार्गदर्शनात सावंत पुढे म्हणाले की मोबाईलमुळे माणसाची श्रवन क्षमता कमी होते आहे. आपल्यातल्या उपजत कलेकडे दुर्लक्ष होते आहे. दोडामार्ग तालुक्यातील ग्रामीण भागातील मुलांकडे उपजतच अभिनय गुण आहे. त्याचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांद्वारे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

यावेळी अध्यक्ष असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत म्हणाले की, शरद सावंत यांनी कॉलेज जीवनापासूनच अभिनय कला जोपासली असून गेली ३५ वर्षे ते नाटक जगताहेत. आतापर्यंत त्यांनी २६ एकांकिकामध्ये काम केले असून, झी मराठी वाहिनीवरील गाव गाता गजाली, रात्रीस खेळ चाले, स्टार प्रहावरील गोठ, धुमशासन आणि कुसवा हे चित्रपट केले असून, आता सोनी मराठीवर छोट्या बयोची मोठी स्वप्न ही मालिका चालू आहे. अशा व्यक्तीचे आपणास मार्गदर्शन लाभले असून आपल्या विद्यार्थ्यांनीही अशी प्रगती करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एस. एन. खडपकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सिंधुर्या सरवनकर हिने मानले. सदर कार्यशाळेचा लाभ अनेक विद्यार्थ्यांनी घेतला.